ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 9 | June - 2016

Review Of Research

# ग्रामीण कथा आणि राजकारण

दिनकर वसंत कुटे

## प्रस्तावना :–



लोकशाही शासन पद्धतीचा देशाने स्वीकार केल्यामुळे खऱ्या अर्थाने खेड्यात राजकारणाला सुरुवात झाली. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगर पालिका, महानगर पालिका, सहकारी सोसायटी, सहकारी संघ, सहकारी साखर कारखाने,सहकारी सूतगिरण्या, सहकारी दूध उत्पादक संस्था, खरेदी विक्री संघ,मार्केट कमिटी, सहकारी बँका पतसंस्था या सर्व क्षेत्रात निवडणुकांचा स्वीकार केल्याने ग्रामीण जीवनात फार मोठ्या प्रमाणात उलथापालथी झाल्या. सर्वसामान्य, भोळी-भाबडी खेड्यातील जनता याला बळी पडू लागली.महिला आणि विविध जातींना आरक्षण मिळाल्यामुळे सर्वांचा सहभाग राजकरणात घेतला; पण त्यांना फक्त सहीचा अधिकार राहिला.राजकारण ठराविक घराण्याची मक्तेदारी ठरली.शिक्षण घेवून बेकार फिरणाऱ्या पिढीला राजकारण्यांनी आपापल्या कळपात ओढले.पुढाऱ्यांच्या मागे फिरणारा तरुणांचा वर्ग वाढला.खाणे, पिणे, गाड्यातून हिंडणे यासारख्या सवयी तरुणांना लागल्या.सतत होणाऱ्या निवडणुका, विविध राजकीय पक्ष, गटातटाचे राजकारण, धर्म, जातीच्या राजकरणासाठी केलेला वापर यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या.राजकारणातील लोक निवडणूक जिंकण्यासाठी साम, दाम, दंड यांचा वापर करू लागले.खेड्यातील लोकांनी निवडणूक प्रतिष्ठेची केल्याने खून, मारामाऱ्या, भांडण, तंटे यांचे प्रमाण वाढू लागले.गावात सरपंच, उपसरपंच, पंच, चेअरमन, व्हा. चेअरमन ही नवीन सत्तास्थाने निर्माण झाली.सत्तांतर, गटातटाचे, जातीपातीचे, पाडापाडीचे, मतासाठी पैशांची देवाणघेवाण यासारख्या मार्गाने सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला जावू लागला.यामुळे पूर्वीचे एकसंघ असणारे खेडे विसखळीत झाले.

शासनाने राबविलेल्या कल्याणकारी योजना आणि सहकार यामध्ये भ्रष्टाचाराची लागण झाली. ग्रामीण जीवनात थोड्या फार सुधारणा झाल्या असल्या, तरी आर्थिक विषमता वाढत गेली, हे नाकारता येणार नाही.लाचलुचपत, भ्रष्टाचार, वशेलीबाजी, गुंडगिरी यांना उत आला.पुढारी आणि शासकीय अधिकारी यांनी प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केल्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होवू शकला नाही.ग्रामीणांच्या जगण्याला एक प्रकारची अवकळा निर्माण झाली.ग्रामीण कथाकारांनी राजकीय जीवणाचे वास्तव आपल्या कथेतून मांडले.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात खेड्याच्या प्रशासनाचे स्वरूप वेगळे होते.पाटील, देशमुख, जमीनदार, सावकार यांचे अस्तित्व खेड्याच्या ग्राम व्यवस्थेशी असल्याने हेच गावचे पुढारी होत. प्रारंभीच्या कालखंडातील कथाकारांनी आपल्या कथेत वरील लोक शेतकरी, कामगार, दलित, स्त्रिया यांना कसे छळतात याचे वर्णन केले आहे. गावागावातील वाद, पाटील, जमीनदार, सावकार यांच्यातील वर्चस्वासाठी चाललेली लढाई याचे वर्णन कथेत येते.या वर्चस्वाला बळी पडलेली सामान्य जनता यांचेही वर्णन कथेत येते.

र. वा.दिघे यांनी आपल्या कथेत पाटील, कुलकर्णी, सरकारी माणसे, अमंलदार, अडाणी दारिद्र्य अवस्थेत जगणाऱ्या माणसांचा कसा फायदा उठवतात याचे चित्रण कथेत केले.शंकर पाटील यांनी रितीरिवाज, खेड्यात पाटलाचा असणारा दरारा कथेतून स्पष्ट केला.शंकर खरात यांनी ग्रामपंचायत व सहकारी संस्था यात चालणारे अपहार कथेत चित्रित करतात.सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हा. चेअरमन यांच्या वृत्तीवर त्यांनी कथेतूनप्रकाश टाकला. ग्रामपंचायत, सोसायट्या ही नवीन सत्तास्थाने निर्माण झाल्यामुळे यांच्यात सत्तेसाठी स्पर्धा सुरुझाली. याच्यातून भांडण, खून, मारामाऱ्या होवू लागल्या.या सर्व गोष्टींचे वर्णन 'मेंबर्स पळवणे', 'पांडोबाचं इलेक्शन', 'स्वागताची तयारी' या कथेततून केले.श्री.म. माटे, अण्णा भाऊ साठे, बी. रघुनाथ, व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके, रणजित देसाई यांनी खेड्यातील राजकारणावर प्रकाश टाकला आहे

१९८० नंतरच्या ग्रामीण कथेत राजकीय जीवनाचे वास्तव अनुभवाच्या पातळीवरून आले.आनंद यादव खेड्यातील राजकीय जीवनाचे प्रत्यकारी चित्रण कथेत करतात. 'नवे वळण' या कथेत गावचे धनगोंडा पाटील कारखान्याचे चेअरमन, जिल्हा परिषदेचे अग्रणी कार्यकर्ते असून गावाचा विकास सांगत आपल्या मुलांना मोठ मोठी पदे मिळावीत यासाठी संपत्ती गोळा करीत आहेत. 'फळ्या आणि पारंब्या' या कथेत रामपूर परिसरात राहणारे बाळासाहेब सुतखंडे हे आमदार गावाचा कायापालट करतात. त्यांच्या निधनानंतर त्यांना साथ देणारा दादासाहेब देशमुख पहिल्या पुण्यतिथीचे आयोजन करून राजकारणात येण्याचे मनसुबे जुळवत असतात, तर त्यांचा थोरला मुलगा बाबूराव त्यांचे स्मारक कारखान्याच्या परिसरात व्हावे यासाठी प्रयत्न करीत आहेत. यातून धूर्त कुलकर्णी आपला स्वार्थ दोघांकडून साधवून

घेतो.'गिधाडं' या कथेत गावाच्या राजकारणामुळे अत्याचाराला बळी पडणाऱ्या नर्सची अभागी कथा सांगितली आहे.'बाकड्यावरच जग' मध्ये कालव्या जवळची शेती हाडप करू पाहणारे कार्यकर्ते, आमदार, खासदार यांचे चित्रण स्पष्ट केले आहे.'नवे वळण' या कथेत कारखान्यात गरिबांच्या मुलांना काम मिळत नाही.पुढारी, सभासद, संचालक, चेअरमन यांच्या जवळच्यांना काम मिळते.यादव यांनी भ्रष्ट, स्वार्थी, धूर्त राजकारणी लोकांचा खरा चेहरा कथेतून वाचकासमोर आणला आहे.

रा.रं. बोराडे यांनीग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या निवडणुकात भोळ्या-भाबड्या व सुशिक्षित बेकार तरुणांना राजकारणापुरता वापर करून घणारे, पुरोगामी विचाराचे स्तोम माजवणारे, राजकारणासाठी जातीचा वापर करणारे राजकारणी सत्तेसाठी कोणत्याही स्तराला पोहचू शकतात हेच आपल्या कथेत अधोरेखित करतात. 'हरिणी' या कथेत स्त्रियांना राखीव जागा राजकारणात ठेवण्यात आल्या; पण खरी सत्ता पुरुषचं उपभोगू पाहतो, हे वास्तव या कथेतून मांडले आहे.सुमन जिल्हा परिषदेची सदस्या असते, ती मिटिंगला निघाली होती.तिच्या बरोबर तिचा पती बळवंतरावही असतो.बळवंतरावाचे तिकीट वाटपामध्ये तिकीट कापले जाते आणि बायकोचे सभापती पदही गेलेले असते. याच्या पाठीमागे शिंद्यांचा हात असतो. शिंद्यानी मेव्हण्याच्या नावावर बांधकाम घेवून पैसा हाडप केलेला असतो. बळवंतराव सुमनला या कामाची चौकशी व्हावी म्हणून मिटिंगमध्ये बोल असे सांगतो.एवढेच नव्हे तर शेषराव काळेनी जि.प. च्या अध्यक्षांना खेड्यातील सदस्य स्त्रियांना सक्रेटरी नेमावेत हे निवेदन तयार केले होते. त्यावरही सही करतो कारण आपणाला मिटिंगमध्ये जाता येईल आणि बोलता येईल. निवेदन अध्यक्षांना देतात तेव्हा अध्यक्ष म्हणतात, "आवो, त्येनला मिटिंगमधी तरी मोकळं बसू द्या. त्येंच्या गळ्यात लोढणं बांधल्यावाणी निदान तिथं तरी बसू नका."[२] मग ते बाहेर पडतात.बांधकामचा विषय निघतो.नवरा खिडकीतून बघत असतो.सुमनचे धाडस होत नाही, ती आपल्या मांडीवर असणाऱ्या बिट्याला चिमटा काढते आणि हॉलच्या बाहेर पडते. स्त्रियांना आरक्षण देवून राजकारणात सहभाग घेतला; पण स्त्रीची पुरुषाकडून अभिव्यक्तीची मुस्कटदाबी होते, हे बोराडे यांनी या कथेतून दाखविले आहे. 'आडवा आडवी' व 'वेढा' या कथेत सहकारी क्षेत्रात शेतकऱ्यांची पिळवणूक, शोषण, आडवणूक कशी केली जाते याचे वास्तव मांडले.बोराडे यांनी ग्रामीण राजकारण आणि सहकार क्षेत्र ग्रामीण जीवनास कसे स्मारक ठरले आहे हे अनेक कथातून दाखवून दिले आहे.

द. ता.भोसले यांनी खेड्यातील राजकारणी आणि राजकारणी लोकांच्या पाठीमागे फिरून कुटुंबाकडे दुर्लक्ष करणाऱ्या सामान्य मानसाच्या कुटुंबाची वाताहात चित्रितकेली आहे.'आधार' या कथेत धुरपा पाटलीन ऑपरेशन करण्यासाठी आईला घेवून दवाखान्यात जाते.नवरा मात्र पुढाऱ्यांनी दिलेला चहा, भजी खात कडक कपड्यात गावात फिरत असतो.बायकोच्या ऑपरेशनपेक्षा दूध डेअरीची निवडणूक त्याला महत्त्वाची वाटते.'ओझे' या कथेत घरात बायको आणि मुलांची उपासमार होत असताना एका चहाच्या कपासाठी सरपंचाच्या मागे फिरणाऱ्या व्यक्तीचे चित्रण केले आहे.'बिनफळाचे झाड' मध्ये सामान्य शेतकरी असणारा बाजीराव मोठ्या पुढाऱ्यांच्या नादी लागून तीन वेळा जिल्हा परिषदेला उभा राहतो आणि पडतो.यासाठी तो कर्ज काढतो, यातच त्याची जमीन जाते.राजकारण हे सामान्य लोकांचे नसून श्रीमंताचे असल्याचे कथेतून स्पष्ट होते.'कमाई' मध्ये पुढारी आणि वन अधिकारी यांना जवळ करून जंगलतोड करणारा चंदरशेठ रंगविला आहे. 'अभिषेक' मध्ये महार समाजातील मूर्तीकार मूर्ती तयार करतो; पण त्याला पुजेचा अधिकार दिला जात नाही. सरपंच, पाटील, सभापती, उपसभापती असे पाचजन पूजेला बसतात.त्यांच्या घरातील मंडळींची पुढच्या जागी बसण्याची व्यवस्था केली होती.महारे एका डगरीवरून हे दृश्य पाहत होती.अवैध धंदे करणारे, गरिबांचा बळी घेणारे हात अभिषेक करीत होते. मात्र घट्टे पडलेलाहात नालायक झाला होता.भोसले खेड्यातीलराजकारण आणि सहकार याला बळी पडणारा सामान्य माणूस, दलित, भटके आणि स्त्रियांचे वास्तव कथेतून आविष्कृत करतात.

चंद्रकुमार नलगे स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण जीवनात राजकारणाचा प्रवेश आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न,याला बळी पडणाऱ्या सामान्यांचे वास्तव कथेत मांडतात.'आत्महत्या' या कथेत निवडणुकीच्या अगोदर आमदार चिंतुन्नाच्या गुऱ्हाळावर रस पिऊन जातो.मदत लागल्यास मला सांगा असे जाताना म्हणतो.मतदान होते, आमदार निवडून येतो.मुलाच्या नोकरीसाठी चिंतून्ना आमदाराच्या घरी जातो; पण त्यावेळी तो बदलतो.'इभ्रत' मध्ये आमदार संकऱ्याच्या मुलाला नोकरी लावायचे म्हणून सांगतो.त्यासाठी तो जमीन विकतो.आमदार आज उद्या करीत त्याला फसवत राहतो.'आक्रीत' या कथेत गावचे पुढारी दलितांचा वापर राजकारणात कसा करून घेतात याचे दर्शन घडविले आहे.'फिरकी' या कथेत मधमाशी चावल्याने डोळ्यात फुल पडलेल्या धोंड्याला अपंग असल्याने पुढारी आरक्षणाच्या जागेवर उभे करतात.तो सभापती होतो.मतलबी पुढारी त्याच्या भोळ्यापणाचा फायदा उठवणार होते.'काळाची पावलं' मध्ये साखर कारखान्याला विरोध करणारे सयाजीराव कारखान्याचे चेअरमन होताना दिसून येतात. नलगे यांनी ग्रामीण राजकारणातील पुढाऱ्यांची स्वार्थी वृत्ती, ग्रामपंचायत आणि साखर कारखाने यांच्या निवडणुकीतील डावपेच, निवडणुकीच्याआधी दिलेली खोटी आश्वासने याचे वास्तव कथेत मांडून सामान्य माणसाला इभ्रत असते; पण पुढाऱ्याना इभ्रत नसते हे राजकारणातील सूत्र मांडतात.

भास्कर चंदनशिव यांनी ग्रामीण भागात राजकारणाने केलेली उलतापालथ व त्यामुळे गढुळलेले, संशयग्रस्त झालेले समाज जीवन कथेतून आविष्कृत केले. 'निवडणूक' या कथेत गावाच्या राजकरणामुळे उद्ध्वस्त झालेल्या दलित कुटुंबाचे चित्रण केले आहे.स्वातंत्र्य भारताने लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला.दलितांना निवडणुकीत आरक्षण दिले.गावाच्या निवडणुकीत पांडोबा निवडून येतो; पण तो एका पार्टीच्या डोळ्यात येतो.पांडोबाचे कोपट जाळले जाते. गावागावात गुंडशाहीमुळे लोकशाही नावालाच उरते, बळी जातो तो दलितांचा हे या कथेतून स्पष्ट केले आहे 'पोस्टर' या कथेत कारखान्याची निवडणूक जाहीर होते. पुढारी लोक आश्वासने देवून गाव पिंजून काढतात.गावात दोन पार्टीतील वातावरण तापते.लिंबाखाली खेळणाऱ्या तायडीने म्हाताऱ्याची काठी घेऊन पोस्टर फाडले.यामुळे गावात दोन पार्ट्यात भांडणे लागतात.एकमेकांची पोस्टर्स फाडली जातात, त्यावर शेण टाकले जाते.ही भांडणे पक्षाच्या पुढाऱ्याकडे जातात.ते गावाचे प्रकरण म्हणून हात झटकतात.गावातील दहा लोकांना दहा वर्षाची शिक्षा होते. ग्रामीण राजकरणाचे वास्तव या कथेत चंदनशिव मांडतात.'तोडणी', 'ईस्कुटा', 'कोळसं', 'नवी हत्यारं' या कथेत ऊस कारखान्याचे डायरेक्टर, चेअरमन, पुढारी, बेफिकीरपणे कसे वागतात याचे चित्रण केले आहे. 'नवी हत्यारं' मध्ये कारखान्याची बॉडी आणि विरोधक कटकारस्थाने कसे रचतात याचे चित्र स्पष्ट केले आहे. लोक सभा, मोर्चाला येत नाहीत म्हणून पुढारी शेतकऱ्यांना उपोषणाला बसवून गायब होतात. उपोषण केलेल्या शेतकऱ्यांची रया गेलेली असते.कोणीही विचारपूस करत नाही.अखेर नेत्यांच्या सांगण्यावरून लिंबू सरबत देवून उपोषण संपते.नेत्यांनी सोबत फोटोवाले, पेपरवाले आणले होते.ते त्यांना प्रतिक्रिया देत होते.उपोषणवाल्यामधून भीमा जाधव पेपर वाल्याकडे बघत बोलतो."साहेब आता काळ बदललाय तवा आमीबी हत्यारं बदलून घेतली फायजीत बघा."[२]शेतकऱ्यांच्या स्वभावाचा फायदा घेणाऱ्या राजकारणी लोकांचे मुखवटे या कथेतून पाडले आहेत.

नागनाथ कोत्तापल्ले वास्तववादी जीवनाचे दर्शन घडविणारे लेखक आहेत.ग्रामीण जीवनातील बदलत्या राजकारणाचे चित्रण त्यांनी कथेत वास्तवाच्या पातळीवर उतरून केले आहे.या दृष्टीने 'राडी' ही कथा महत्त्वाची वाटते.राजकारणाच्या अग्निकुंडात भोळी भोबडी माणसं कशी समिधासारखी पणाला लावली जातात.याबरोबर सुशिक्षित बेकारांचे राजकारणी माणसांबरोबर कशी कोंडी होते, याचे वास्तव या कथेत मांडले आहे.'खेळी' मध्ये डोंगरी विकास महामंडळातील दोन कामगार नेत्यामधील स्पर्धात्मक राजकारणाचे चित्रण येते.'पर्याय' या कथेत सामान्य माणसाचा गावातील राजकारणामुळे बळी कसा जातो याचे वास्तव मांडले.'दाद' या कथेत दोन्ही गावाच्या पाटलाकडे न्यासाठी हिलपाटे घालणाऱ्या शेळया राखणाऱ्या मुलाचे दर्शन घडविले आहे. कोत्तापल्ले यांनी ग्रामीण राजकारणाला भोळी-भाबडी जनता, सुशिक्षित बेकार, प्रामाणिक शिक्षक कसे बळी पडतात याचे दर्शन घडवून शिक्षण व्यवस्थेत राजकारणाचा झालेला प्रवेश, यामुळे मूल्यांची झालेली पडझड कथेत मांडली आहे.

महादेव मोरे गावातील राजकारण, काळे धंदेवाल्यांना मिळत असणारा राजकीय पुढाऱ्यांचा आश्रय, दोन पार्ट्यातील संघर्ष, गुंडप्रवृत्तींच्या लोकांना राजकीय फूस मिळत असल्यामुळे गावाचे सार्वजनिक जीवनात निर्माण झालेल्या समस्याचे वास्तव अधिक नेटकेपणाने कथेत मांडतात. 'चक्रव्यूह' या कथेत राजकीय

पुढाऱ्यांच्या आश्रयाने गुंड गुंडागिरी कसे करतात, याचे प्रभावी चित्रण केले आहे.दत्तपुरात मगदूम आणि जाधव ही दोन घराणे गावटी दारूच्या धंद्यातून बलदंड होतात.या दोन घराण्यात दुस्वास निर्माण होतो."दोन्ही गटांत धुमसणाऱ्या वैरग्नीत वेळोवेळी तेल ओतून आणखी भडका उडवून देत असत... अशा निवडणुकीच्या निमित्ताने राजकारणात खेचल्यामुळे दोन्हा गट मुजोर झाले होते.त्यांच्या गुंडगिरीला पुढाऱ्यांनी राजकीय प्रतिष्ठा मिळवून दिली होती अन् गुन्हगारी जगतात त्यांचे आसनही स्थिर करून दिले होते."[3] दोन्ही गटाच्या तालमी असून तरणीबांड पोरे यांच्या पाठीशी आहेत. गावातील बायकांचे दागिने लुटणे, इज्जत लुटणे, दरोडे टाकणे, विरोध करणाऱ्यांचा खून करणे यामुळे गावातील लोक हैराण होतात.यांच्या विरोधात कोणी काहीही करू शकत नव्हते, कारण यांना राजकीय पक्षांचा पाठिंबा होता. 'झेल' या कथेत दीन दुबळ्याचे पुढारी म्हणवून घेणारे त्यांनाच कसे लुटतात याचे वास्तव मांडले आहे. काळेधंदे, गुंडागिरी, खून, भांडणे या समस्यांना राजकीय पुढारी व पोलीस अधिकारी यांना महादेव मोरे जबाबदार धरतात.

वामन होवाळ यांनी बदलत्या खेड्यातील बदलत्या राजकारणावर प्रचंड हल्ला चढविला आहे. ग्रामीण भागात पुढाऱ्यांच्या पाठीमागे पळणारी जनता दिसून येते.कार्यक्रमाचे उद्घाटन मंत्र्यांचे हस्ते व्हावे अशी लोकांची अपेक्षा असते.गावातील पाटील व सरपंच स्वतःचे अस्तित्व निर्माण करताना दिसून येतात. या दृष्टीने 'उद्घाटन' व 'धुराळा' या महत्त्वाच्या कथा ठरतात.'धुरळा' या कथेत शांताबाई देशपांडे यांना जिल्हा पंचायतीच्या सदस्यामुळे जीवन शिक्षण मंदिर वडगाव येथे नोकरी लागते.पंचायत सदस्य रामभाऊ आणि दिनकर पाटील बाईनी आपल्याकडे खोली करून रहावे यासाठी चढाओढ करतात आणि तिचे लैंगिक शोषण करण्याचा प्रयत्न करतात.वामन होवाळ यांनी राजकारणी लोकांचा खरा चेहरा आपल्या कथेतून वाचकांच्यासमोर आणला आहे.

प्रतिमा इंगोले यांनी नातीहीन राजकारण्यांचा समाचार कथेत चांगल्या रीतीने घेतला आहे. ग्रामीण भागातील राजकरणामुळे माणसाला आलेले बाजारीरूप, खोटी प्रतिष्ठा व राजकारणी लोकांच्या मागे धावणारा खेडूत यांचे चित्रण कथेत करतात. 'निवडणूक' या कथेत नगराध्याक्षपद महिलासाठी राखीव असल्यामुळे मध्याच्या बायकोचा फॉर्म भरला जातो. या अगोदर कामे झाली नसल्याने लोक मतदानावर बहिष्कार टाकण्याची भिती दाखवतात. झोपडपट्टीतील लोक पैसे मागतात, राजकीय पक्ष आणि नेते मंडळींनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केलेली होती. शेवटी मध्याची बायको पडते.राजकारण हे सामान्य माणसाचे क्षेत्र नाही याची जाणीव या कथेत होते.'मावळती' या कथेत सत्तेमागे धावणाऱ्या खेडुताचे चित्रण केले आहे. 'झेंडावंदन', 'संस्थादिश', 'निवडणूक', 'पदवीदान' व 'अमंगल युग' या कथात तत्त्वहीन राजकारणाचे दर्शन घडविले आहे.या दृष्टिने 'पदवीदान' ही महत्त्वाची कथा आहे.गढूळ मूल्यहीन राजकारणामुळे गढूळ बनत चालेल्या समाजिक जीवनाचा प्रत्यय प्रतिमा इंगोले यांच्या कथेतून येतो.शिक्षणाचे बाजारीकरण करणारे पुढारी, संस्थाचालक, शिक्षक भरतीतील वशिलेबाजी, बेशिस्त विद्यार्थी याचे वास्तव त्यांनी अनेक कथेत घडविले आहे.

कृष्णा इंगोले ग्रामीण भागातील राजकारण, त्यांच्यातील हेवेदावे, राजकारणातील स्वार्थी वृत्ती, शेतकऱ्यांच्या समस्येशी खेळणारे राजकारणी आणि निवडून आल्यानंतर जनतेकडे पाठ फिरवणारे पुढारी यांचे प्रत्यकारी चित्रण कथेत करतात. 'कथा पाण्याच्या' या कथेत दुष्काळात निवडणूक तोंडावर आल्यावर चाणाक्ष राजकारणी पाणी परिषद घेतात. या परिषदेसाठी खासदार, मंत्री, जि.प. अध्यक्ष, कारखान्याचे अध्यक्ष, गावागावातून पुढारी येतात.सर्वांची भाषणे झाल्यावर मुख्यमंत्री शेवटी आपल्या भाषणात निवडणुकीत आम्हाला मते द्या. पुढच्या निवडणुकीपर्यंत पाण्याचे नंदनवन फुलवू असे आश्वासन देवून निघून जातात. दुष्काळात पाण्याचे भांडवल करून निवडणुका लढवणाऱ्या पुढाऱ्यांचे वास्तव चित्र वाचकासमोर मांडले आहे. 'लगीन' कथेत लग्नात हाजरी लावणाऱ्या आमदार मानसिंग जगतापचे दर्शन घडते. 'वाकडी बाभळ' या कथेत शेतकरी भावांच्यात भांडणे लावून स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या राजकारण्यांचे चित्र स्पष्ट केले. 'पाणी' या कथेत तुका खराताला फसवून पाणी असणारे शेत विकत घेवून त्याला देशोधडीला लावणाऱ्या राजकारणी दादासाहेबांचे चित्र रेखाटले आहे.'मरीआईचा फेरा' मध्ये गावात कॅलरा पसरल्याने गावातील जुन्या आणि नव्या पिढीच्या वैचारिक संघर्षात सापडलेल्या सरपंचाचे चित्रण येते.कृष्णा इंगोले यांनी खेड्यातील सरपंचापासून राज्याच्या मुख्यमंत्र्यापर्यंतच्या राजकारणी लोकांचे वास्तव कथेत मांडले आहे.ग्रामीण जनतेला उद्ध्वस्त करणारे शेतकऱ्यांचे प्रतिनिधीच आहेत, हे आपल्या कथेत अधोरेखित करतात.

जयराज खुने गावातील राजकारण, राजकारणातील ईर्षा, गावाच्या राजकारात दलितांचा उपयोग करून घेणारे राजकारणी, दलितांचे पुढारी दलितांचा विश्वासघात करत असल्याचे चित्र कथेत स्पष्ट करतात. 'इस्कुटा' या कथेत खेड्यातील राजकारणी दलितांच्यात फूट पाडून कसे स्वार्थ साधतात आणि गावाच्या राजकारणामुळे दलित समाजाचा कसा इस्कुटा होतो, याचे वास्तव मांडले आहे.'शांतामाय' या कथेत बाबासाहेबांनी सांगितेला मार्ग सोडून चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांचा समाचार घेतला आहे.'आगडोंब' या कथेत जना खोत दुष्काळात उपाशी मरणाऱ्या लोकांसाठी तळे मंजूर करून आणतो, तर त्याचा विरोधक सरपंच तळयाची जमीन वकील भावाला घेवून ट्रस्टी करतो. स्वतः अध्यक्ष होतो. मेव्हण्याला सचिव करतो.नात्यातील माणसांना सभासद करतो आणि तळ्याचे काम बंद पाडतो.गावातील राजकारण्यांच्या इर्षेमुळे दलितांची उपासमार कशी होते हे वास्तव कथेत येते.गावातील ग्रामपंचायत मध्ये दलितांना आरक्षण मिळाले; पण गावातील राजकारणी दलितामध्ये फूट पाडतात, त्यांच्यात भांडणे लावतात आणि सत्तेचा उपभोग घेतात. दलितांचे पुढारी दलितांच्या हितासाठी काम न करता दलितांनाच कसे नाडतात,याचे भयाण वास्तव जयराज खुने यांनी कथेतून आविष्कृत केले आहे.

नामदेव माळी यांच्या कथेत खेड्यातील राजकारण आणि सहकार यांचे पाऊलो पाऊली दर्शन घडते. 'लाटा' या कथेत नोकर भरतीमध्ये, शिक्षण संस्थामध्ये राजकारणी लोकांचा हस्तक्षेप आणि त्यांनी शिफारसपत्र दिलेल्या व्यक्तींचीच निवड होते.संस्थामध्ये राजकीय लोकांचे हितसंबंध जोपासले जातात, हे येथे स्पष्ट होते.'हिरवं सपान' या कथेत पिढ्यान्पिढ्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पाण्याचे आमिष दाखवून निवडून येणाऱ्या, शेतकऱ्याविषयी कळवळा नसलेल्या पुढाऱ्यांचे दर्शन घडविले आहे.'बिलामत' या कथेत साधा सरळ माळकरी माणूस गावातील पुढाऱ्यांच्या कारस्तानाला कसा बळी पडतो याचे वास्तव मांडले आहे.'सांगड' या कथेत आपल्या फाटक्या प्रपंच्यासाठी सदा सोसायटीचं कर्ज काढतो आणि तो कर्जातच बुडतो.कर्जमाफी होणार असे सांगून पुढारी गावात चांगल्या जेवणावर ताव मारून गेले आणि सदाच्या घरादारावर जप्तीची नोटीस आली.तो शेताचा आधार असणारा बैल विकतो.

'बिल' या कथेतकारखान्यातील राजकारणामुळे सामान्य शेतकऱ्याची स्वप्ने कशी धुळीस मिळतात याच्यावरती प्रकाश टाकला आहे.नामदेव माळी गावातील कारस्थानी पुढारी, जनतेला भूलथापा देणारे पुढारी, कारखान्यातील, शैक्षणिक संस्थातील राजकारणी हे सर्वच लोकांची फसवणूक करून स्वतः चा स्वार्थ कसे साधतात, याचे वास्तव कथेत मांडले आहे.

सदानंद देशमुख यांनी कथा लेखनातून ग्रामीण राजकारण्यांचा खरपूस समाचार घेतला आहे.'कडी लाव आतली' या कथेत गावच्या राजकारणात सभ्य माणसाची झालेली वाताहात चित्रित केली आहे. 'हिरवी थोंब' या कथेत पुढारी आणि पोलिसांना चिरमिरी देवून मोतीराम पाटील गावात दारू, मटका, गांज्याचा धंदा सुरू करतो. या अड्ड्यावर आसपासच्या गावचे सरपंचही येताना दिसून येतात.'गाभुळगाभा' या कथेत चंदन चोरी करणाऱ्यांना आमदार खासदारांचा आश्रय मिळत असल्याचे स्पष्ट करतात.सदानंद देशमुख राजकीय लोकांची स्वार्थीवृती, कारस्थाने आणि अवैध धंद्याला असणारा आशीर्वाद याचे वास्तव कथेत मांडतात.

मोहन पाटील यांनी खेड्यातील राजकारणाचे वास्तव वाचकांच्या समोर आणले आहे. गावातील ग्रामपंचायत निवडणुकीतील राजकारण, गटतट, कार्यकर्ते, निवडणुकीचे वातावरण, पुढाऱ्यांची खेळी या सर्वाचे चित्रण ते कथेत करतात. 'नवी बॉडी' या कथेत बासोडी गावाची ग्रामपंचायत निवडणूक होते आणि गावाला नको असणारा गुंड्या गणपतीचा पॅनल निवडून येतो. त्यांची पाहिलीच सभा भरते, या सभेला गावच्या शाळेतील मास्तर हजर झाले.मास्तर शाळेचे प्रश्न मांडतात आणि बगीचा करण्याचा प्रस्ताव मांडतात.शाळा पहिल्या बॉडीने बांधली असल्याने त्यांनी भरपूर भ्रष्टाचार केला आहे.तो उघडकीस आल्याशिवाय पुढचे काम होणार नाही, असे नवी बॉडी सांगते.मास्तर त्यांना विनंती करतात, मी सेवानिवृत्त होणार आहे. तेव्हा इमारतीची दुरूस्ती केली, तर माझ्या आत्म्याला शांती लागेल. त्यावेळी बॉडी

प्रतिउत्तर देते तुमचा शाळेसमोर पुतळा बांधू; पण त्यांच्या भ्रष्टाचार बाहेर काढल्याशिवाय आम्ही दुरूस्ती करणार नाही. विकास कामात गावचे पुढारी एकमेकांचे खच्चीकरण करण्यातच आपली शक्ती खर्च करतात.शूद्र प्रवृत्तीच्या राजकारणी लोकांचे दर्शन या कथेत घडते. 'फायनल बील' या कथेत ग्रामीण भागात साखर कारखाने सुरुझाले. पाण्याच्या पटकऱ्यापासून कारखान्याच्या चेअरमनपर्यंत धावपळ कशी होते आणि ग्रामीण भागात राजकारणाला कसा जोर येतो, याचे चित्रण केले आहे.

राजन गवस ग्रामपंचायत, सोसायटी, दूध डेअरी आणि तालुक्यातील राजकीय पुढाऱ्यांचे दर्शन कथेत घडवितात.'नवाचं तीन चतुर्थांश' मध्ये गावची सरपंच पदाची जागा महिला ओबीसी ला जाहीर होते.तात्या पाटालाची बॉडी निवडून येते; पण ओबीसी महिला पडते.शिंद्याच्या बॉडीतील ओबीसी महिला निवडून आल्याने ती सरपंच होते.तात्या पाटील मिटिंग बोलवून सुंदरा मिसाळ हिला राजीनामा द्यायला लावतात.बापू कुंभाराची बायको पोट निवडणुकीत निवडून येते.गावभर जल्लोष होतो.शिंदे तालुक्याच्या वकिलाकडे उंबरे झिजवत होते.गावच्या राजकारणातील डावपेचाचे चित्रण या कथेत केले आहे. 'तिप्या मी आणि सैराट' या कथेत दूधाचे माप घालणरा तिप्या तालुक्याच्या राजकारणापर्यंत कसा पोहचला याचे वर्णन केले आहे.' ठराव' या कथेत काळे धंदे चालवणाऱ्यांच्या इशाऱ्यावर चालणाऱ्या राजकीय लाकांचे दर्शन घडविले आहे.राजन गवस यांनी ग्रामीण राजकारणाचे वास्तव मांडून, लोकशाही मूल्यांची झालेली पडझड आपल्या कथेत स्पष्ट केली आहे.

लक्ष्मीकांत देशमुख राजकीय पुढाऱ्यांचे वास्तव कथेमधून निर्भिडपणे मांडतात.राजकारणी लोकांची दुटप्पी भूमिका कोणतेच काम होवू देत नाही. सरपंचापासून मंत्र्यापर्यंतच्या राजकारणींचा समाचार तेकथातून घेतात. 'लढवय्या' या कथेत सेवानिवृत्त झालेल्या महादेव कांबळेला सिलिंगमधून आपली जमीन गेली हे सरपंचांना बघवत नाही. तळयासाठी स्वत:ची गेलेली जमीन शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून रद्द करतात आणि महादेवची जमीन घालवतात. 'भूकबळी' या कथेतील रघू सरपंचाकडे धान्य मागायला जातो.सरपंच धान्य देत नाहीत.सरपंचाने धान्य दिले असते, तर ठकुबाई या त्याच्या बहिणीचा भूकबळी गेला नसता.'हमी कसली हमी!' या कथेत शेतकऱ्यांची जमीन पाझर तलाव्यात जावू नये म्हणून त्यांना मदत करणारे आणि दुष्काळी जनतेला काम द्या नाही, तर उपोषण करू अशी दुटप्पी भूमिका घेणाऱ्या आमदाराचे दर्शन घडविले आहे. 'दौरा' या कथेत मुंबईहून दुष्काळाची पाहणी करण्यासाठी आलेल्या पत्रकांराची पालक मंत्री पंचतारांकित हॉटेलात सोय करतात. आपण दुष्काळग्रस्तांसाठी राबविलेल्या योजनांची खोटी माहिती देऊन त्यांना पाठवतात.'पाणी चोर' मध्ये श्रीमंत शेतकरी आणि त्यांचेच मंत्री दुष्काळातील शेतकऱ्यांना जाणारे पाणी अधिकाऱ्यांना हाताशी धरून कसे बंद करतात याचे वास्तव चित्रित केले आहे.लक्ष्मीकांत देशमुखांनी राजकारणी लोकांना जवळून पाहिले आहे.कोणताही आडपडता न ठेवता कथातून त्यांचे खरे रूप वाचकासमोर आणले आहे.

आप्पासाहेब खोत यांनी कथेत ग्रामीण भागात राजकारणाची लालसा सर्व व्यक्तीत निर्माण झाली असून सुशिक्षित तरुणपिढीचा राजकारणी लोक कसा फायदा घेतात याचे चित्रण केले. 'गळफास' या कथेत पुढाऱ्यांच्या आणि त्यांच्या मुलांच्या मागे फिरणाऱ्या तरुण पिढीचे दर्शन घडविले आहे.'मुक्ता' या कथेमध्ये राजकारणी लोक स्त्री स्वातंत्र्याचे गोडवे गातात; पण प्रत्यक्ष स्त्रियांना घराबाहेर पडू देत नाहीत, हे वास्तव मांडले आहे.'परतफेड' या कथेत राजकारणी लोक दुष्काळात शेतकऱ्यासाठी उपाययोजना करीत नाहीत. शेतकऱ्याने जीवनयात्रा संपल्यावर मात्र कर्जमाफी आणि एक लाख रुपयाची आर्थिक मदत करताना दिसून येतात.आप्पासाहेब खोत यांनी ग्रामीण भागातील राजकीय जीवनाचे माफक दर्शन घडविले असून तेही त्रोटक स्वरूपाचे आहे.

वामन जाधव आपल्या कथेत ग्रामपंचायत निवडणुका, त्यातील राजकारण, डावपेच, नात्या नात्यातील राजकारण, पक्ष प्रवेश, कार्यकर्त्यांची जमवा जमवी, स्त्री आणि वंचीत घटकांना मिळालेले आरक्षण याचे चित्रण करतात. 'तिकीट' या कथेत निवडणुकीसाठी पक्षांतर करणरे पुढारी निवडून आल्यानंतर स्वगृहात घेणारा पक्ष आणि आंधळेपणाने चित्राच्या पुढे शिक्का मारणारा ग्रामीण समाजाचे चित्रण केले आहे.'शपथ' या कथेत राजकारणी लोक मतासाठी मुस्लीम लोकांना कुराण शिवायला लावून आपल्याला मते कशी मिळवतात, याचे वास्तव मांडले आहे.'आदेश' मध्ये राजकारणी फिरतात एकासंगे आणि मतदान करायला लावतात दुसऱ्याला, हे राजकारणातील खरे वास्तव मांडले. 'आक्रोश' मध्ये स्त्रियांना आरक्षण मिळाले.स्त्री सरपंच झाली; पण खरी सत्ता पुरुषच उपभोगतो हे स्पष्ट केले आहे.'पदर' या कथेत ग्रामपंचायत निवडणुकीसाठी एकमेकांचे व्याही होवून बेरजेचे राजकारण करणाऱ्या पुढाऱ्यांचे चित्रण येते.'अंधार' या कथेमध्ये सुशिक्षित बेकारांना नोकरीचे आमिष दाखवून राजकारणात उपयोग करून घेणाऱ्या पुढाऱ्याचे दर्शन घडविले आहे. वामन जाधव यांनी कथेत ग्रामीण राजकारणातील डावपेच, स्वार्थीवृत्ती, बेरजेचे राजकारण, पक्षांतर याचे वास्तव मांडून राजकारणी लोकांचा अंदाज कुणाला लागत नाही, हेच ते कथातून अधोरेखित करतात.

किरण गुरव यांनी राजकारणाने घेतलेले नवे वळण, खेड्याचे ढासळलेपण, पुढाऱ्यांचे अवास्तव खेड्यात वाढणारे महत्त्व, गावातील राजकारण व सर्व क्षेत्रात पुढाऱ्यांचा हस्तक्षेप याचे चित्रण कथेत करतात. 'डिजीटल मृगजळाचा प्रवास' या कथेमधील जगण्याला स्वयंम रोजगारासाठी समाज कल्यानचे कर्ज काढायचे होते.यासाठी स्थानिक खादी ग्रामोद्योगाचा कर्ज नसल्याचा दाखला हवा होता.एक हाती कारभार करणारा नलवडे क्लार्क दाखला देण्यासाठी टाळाटाळ करू लागतो.शेवटी गावातील वजनदार माणूस ग्रामपंचायत सदस्य रघू चौगल्याला मध्ये घालावे लागते.मग दाखला मिळतो. शासकीय अधिकारी सामान्य माणसाचे काम करण्यास टाळाटाळ करतात; पण पुढाऱ्याने सांगितले की लगेच करतात, हे खेड्यातील वास्तव कथेत मांडले आहे.'श्रीलिपी' मधील नारायण हरी गावचा पुढारी नानाच्या कृपेने आपल्या धाकट्या मुलाला ग्रामपंचायत सदस्य करतो. भावकीतल्या सूरजला शाळेत बारगे सर मारतात.सारी भावकीसह नारायण हरी शाळेत हजार होतो आणि चांगलाच खल करतो.नारायण हरी तर ग्रामसभेला पहिलाच विषय घेवून शाळा बंद पाडायची असे बोलतात.गावातील राजकारणाचे चित्रण या कथेत केले आहे. 'क्लॉक अवर बेसीस' मध्ये शिक्षक भरतीमध्ये संस्थेचे राजकारण कसे चालते यावर प्रकाश टाकला आहे. किरण गुरव यांनी राजकारणी लोकांचे वास्तव दर्शन आपल्या कथेत घडविले आहे.

शशिकांत चौधरी यांनी 'तांबडफुटी' या कथेत नव्या पिढीतील राजकारण, नीतीभ्रष्ट झाल्याचे स्पष्ट केले आहे. बापूसाहेब हे काँग्रेसचे गांधीवादी विचारश्रेणीचे पुढारी एकेकाळी जिल्हा अध्यक्ष होते.काळ बदलला राजकारणात आता स्वार्थी, लबाडी, ढोंगी माणसांनी प्रवेश केला.मा.ना. गुलाबराव भेंडे पाटील न्याय विधि गृहनिर्माण, नगररचना सांस्कृतिक मंत्री आणि मुकुटराव यांच्या संघर्षात बापूसाहेब मुकुटरावांच्या पाठीमागे उभे राहिले. मुकुटराव दिलेल्या शब्दाला जागले नाहीत.बापूसाहेबांच्या भोळेपणाचा फायदा उठवतात.बापूसाहेबांचे कुटुंब रस्त्यावर येते.बापूसाहेबांना मंत्रालयात गुलाबराव म्हणतात.'अहो, राजकारण म्हणजे वेश्ये सारखं आहे.कुणीबी यावे वेश्येच्या अंगावर पैसा फेकावा. मोबदल्यात स्वत:ची खाज भागवून घ्यावी."[४] ते राजकारणात काय चालते ते सांगतात.शेवटी गुलाबराव विनाअनुदानित कॉलेज बापूसाहेबांना काढायला सांगतात.माझे नाव द्या पाहिजे तेवढा पैसे पुरवतो.बापूसाहेब आपली चूक कबूल करून आनंदात पत्नीसह घरी येतात.

राजकारण ही संकल्पना ग्रामीण जीवनाला नवीन नाही.तिचे दिवसेन दिवस स्वरूप बदलत गेले आहे.स्वातंत्र्यपूर्व खेड्यातील कारभार पाहणारे पाटील, कुलकर्णी, देशपांडे, देशमुख होते.त्यांचे सुरुवातीच्या ग्रामीण कथेत वर्णन येते.सत्तास्पर्धा, शोषण, गुलामगिरी, अत्याचार हे आजपर्यत चालतच आले आहे.र. वा.दिघे, शंकर पाटील, अण्णा भाऊसाठे, बी. रघुनाथ, शंकर खरात, व्यंकटेश माडगूळकर, रणजित देसाई यांनी खेड्यातील राजकारणावर प्रकाश टाकला आहे.स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण राजकारणाचा चेहरा मोहरा बदलून गेला.सत्तेची लालसा प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली.पूर्वीचे राजकारणी जनहिताला प्राधान्य देत असतं, आजचे राजकारणी स्वहिताला प्राधान्य देत आहेत.लोकशाही शासनप्रणालीमध्ये खऱ्या अर्थाने राजकारणाला सुरुवात झाली.सतत होणाऱ्या निवडणुका, विविध राजकीय पक्ष, दबावगट, डावपेच, गटातटाचे राजकारण, राजकारणात जाती धर्माचे भांडवल करणारे पुढारी यामुळे ग्रामीण जीवन उद्ध्वस्त होत आहे.राजकीय पुढाऱ्याशिवाय कोणतेही पान हालत नाही.त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला पुढाऱ्यांचा आश्रय घ्यावा लागतो.राजकीय लोकांची स्वार्थी वृत्ती, भ्रष्टाचार, शोषण, अत्याचाराला ग्रामीण समाज बळी पडत आहे.१९८० नंतरच्या कथाकारांनी आपल्या कथेत ग्रामीण राजकारणाचे खरे स्वरूप लोकापर्यंत आणले आहे.

*संदर्भ :*


१. बोराडे रा.रं. : बोरी बाभळी, हिरणी, प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्र.आ. २००३, पृ. १५५

२. चंदनशिव भास्कर : आंगारमाती, नवी हत्यार, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, च.आ. २०१२,पृ. ५७

३. मोरे महादेव : काळोखातील काळोख, चक्रव्यूह, रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, आ. २०१२, पृ. १५

४. चौधरी शशिकांत : उसवलेलं मन, तांबडफुटी, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, द्वि.आ. २०१३,पृ. २९